सरकारतर्फे **साक्षदार क्रमांक ३** यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि
**नाव - रत्नमाला रविंद्र बेलेकर,**
वय - ४२ वर्ष, व्यवसाय – घरकाम,
राहणार – अरोली, ता. मौदा, जिल्हा - नागपूर.

**सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता श्री. एस. जी. इंगळे यांच्यामार्फत -**

**१.** आरोपी शैलेंद्र माझे भासरे (पतीचा मोठा भाऊ) लागतात. तान्हाबाई ही माझी सासू आहे. तान्हाबाईकडे सहा एकर शेती होती. तान्हाबाईला चार मुले नामे रमेश वासूदेव बेलेकर (मयत), शिशुपाल वासूदेव बेलेकर, शैलेंद्र वासूदेव बेलेकर व रविंद्र वासूदेव बेलेकर अशी आहेत. तान्हाबाईने आरोपी शैलेंद्रला २ एकर शेती व बाकी तीन मुलांना प्रत्येकी १ एकर वाटून दिली.

**२.** घटना दिनांक २२.०४.२०२५ रोजी सकाळी १२.०० वाजता तान्हाबाईच्या घरासमोरील रोडवर घडली होती. माझे पती रविंद्र बेलेकर हे सकाळी १०.०० वाजता शेतावर गेले व दुपारी १२.०० वाजता घरी आले. रविंद्रने मला सांगितले की, आपल्या शेतातील धुरे आरोपी शैलेंद्रने ट्रॅक्टरच्या सहाय्याने तोडून टाकले. त्यामुळे मी व माझे पती रविंद्र तान्हाबाईसोबत बोलायला गेलो. मी तान्हाबाईसोबत बोलत असता, आरोपी शैलेंद्र तेथे आला व मला, "तुझ्या मायचा पुदीत लवडा" अशी शिवीगाळ केली. त्यामुळे माझे ब्लड प्रेशर लो (Low) झाले होते. आरोपीने माझ्या पती रविंद्रचा गळा पकडला व बुक्क्यांनी मारहाण केली होती. त्यानंतर मी पो.स्टे., अरोली येथे गेली व आरोपीविरूध्द फिर्याद दिली.

**३.** आता मला मी दिलेली फिर्याद दाखविण्यात आली. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. सदर फिर्यादीला **निशाणी क्र.२३** देण्यात येत आहे. आता मला सदर फिर्यादला अनुसरून तयार केलेला छापील प्रथम खबर अहवाल

दाखविण्यात आला. तो तोच असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. सदर छापील प्रथम खबर अहवालला **निशाणी क्र.२४** देण्यात येत आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी पोलीसांनी येवून घटनास्थळ पंचनामा केला. मी पोलीसांना घटनास्थळ दाखविले. पोलीसांनी माझे बयाण घेतले होते. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>उलटपास आरोपींतर्फे विद्वान वकील श्री. ए. एस. रेवतकर यांच्यामार्फत-</u>**

**४.** तान्हाबाईच्या शेतीची वाटणी १० वर्षांपूर्वी झाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे रविंद्रसोबत लग्न झाल्यापासून आम्ही वेगळे राहत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी सासू तान्हाबाई कधीच माझ्यासोबत राहिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी सासू तान्हाबाई व भासरे आरोपी शैलेंद्र यांच्यासोबत माझे केव्हाच पटले नाही.

**५.** मी न्यायालयात वाटणीबाबत खटला दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, शिशुपाल हा तान्हाबाईचे पालन-पोषण करते. हे म्हणणे खरे आहे की, शिशुपालला एक एकर जास्त शेत दिले आहे व तो त्याची वहिजुत करतो. तान्हाबाई ही शिशुपालसोबत न राहता बाजूला जवळच्या घरात राहतात. मी तान्हाबाईला सारख्या वाटण्या करून देणेबाबत म्हटले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही तान्हाबाईसोबत बोलणीकरिता त्यांच्याकडे गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझ्या पतीने तान्हाबाई जेवत असताना तिचे ताट उचलून बाजुला फेकले. हे म्हणणे खरे नाही की, तेथे तान्हाबाई व आमचा वाद-विवाद झाला. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे तेथे शैलेंद्र वाद-विवाद सोडविण्याकरिता आला होता. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही शैलेंद्रला काठीने मारहाण केली व त्याच्या डोक्यातून रक्त निघाले. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पतीवर मारहाणीबाबत मा. न्यायालयात खटला सुरू आहे.

**नि.फौ.ख.क्र.१२५/२०२५**
**सरकार वि. शैलेंद्र बेलेकर**
**नि.क्र.२२.**

**६.** हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या आजूबाजूला बऱ्याच लोकांची घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीविरूध्द आरोपी तक्रार देईल म्हणून मी आरोपीविरूध्द सदरचा खोटा गुन्हा नोंद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे आरोपीने मला शिवीगाळ व माझ्या पतीला मारहाण केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

**सा.ब.वा.दा.ब.अ.क.के.**

श्रवणोत्तर स्वीकृत. समक्ष,

मौदा. Sd/-

दिनांक : १२.०५.२०२६ **(एन.के. वानखडे)**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, मौदा.